Sir H. N.
Reliance
Foundation Hospital
RESPECT FOR LIFE

# संशोधनातील सहभागीचे अधिकार आणि जबाबदाऱ्यांचे चार्टर

**संशोधनातील सहभागीचे अधिकार**

**संशोधनातील सहभागी या नात्याने तुम्हाला खालील प्रमाणे अधिकार आहेत:**

1. संशोधकांसोबत माहितीपूर्ण चर्चा करणे, याचे अभ्यास याचे उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करत आहे असे संशोधनातील प्रश्न स्पष्ट करून सांगतली जावी, तुम्ही कसे सहभागी व्हाल, अभ्यास किती काळ सुरू राहील, आणि तुमची अभ्यासातील भूमिका, स्पष्ट करून सांगतील. ही चर्चा तुम्हाला समजणाऱ्या भाषेत आणि कोणत्याही दबावाशिवाय केले जाईल व तुमचे अभ्यासात सहभागी होण्यासाठी इच्छा आहे की नाही याचा निर्णय घेण्यासाठी तुम्हाला पुरेसा वेळ दिला जावा.
2. वाजवी प्रमाणात दृष्टीपथात असलेल्या जोखमी आणि अभ्यासात सहभागी होण्यातील संभाव्य फायदे यांची तुम्हाला माहिती दिली जावी.
3. वाजवी प्रमाणात दृष्टीपथात असलेल्या जोखमींची आणि तुम्हाला या अभ्यासात सहभागी होण्यासाठी काही भरपाई दिली जाईल का याची माहिती दिली जावी.
4. गुप्तता आणि गोपनीयता.
5. तुमच्याबद्दल गोळा करण्यात आलेली माहिती कोणाला उपलब्ध असेल आणि तुमची गोपनीयता कशी सुरक्षित ठेवली जाईल याची माहिती दिली जावी.
6. संशोधनाचा कोणता भाग प्रायोगिक आहे आणि प्रमाणित सेवा कोणती आहे हे समजून घेणे.
7. संशोधन, संशोधनाशी संबंधित इजा, संशोधन प्रयुक्त म्हणून तुम्हाला असलेले अधिकार, चिंता, तुमच्या अधिकारांचे उल्लंघन, आणि/किंवा तक्रार या गोष्टी व्यक्त करण्यासाठी तक्रार कशी करणे आणि त्याचे निवारण कसे करून घेणे याची माहिती दिली जाणे.
8. कोणताही दंड केला न जाता किंवा कोणत्याही फायद्याचे नुकसान न होता अभ्यासातून माघार घेणे किंवा सहभागी होण्यास नकार देणे (अभ्यास सोडून गेल्यास त्याचा तुमची वैद्यकीय सेवा, विद्यार्थीदशा, कामाची स्थिती, वगैरे. यावर काही परिणाम होणार नाही).
9. तुम्हाला असलेल्या संशोधनाव्यतिरिक्त इतर उपचारांच्या पर्यायांची आणि सेवा सुरू ठेवण्याविषयी माहिती दिली जाणे.
10. तुम्हाला संशोधनाशी संबंधित इजा झाल्यास, उपचारांच्या तपशिलाची आणि त्यासाठी कोण खर्च करेल याची माहिती दिली जाणे.

**संशोधनातील सहभागीच्या जबाबदाऱ्या:**

**संशोधन अभ्यासातील सहभागी या नात्याने तुम्ही खालील जबाबदारी पूर्ण करणे, अपेक्षित आहे:**

1. संमती प्रपत्र आणि इतर दस्तऐवज वाचा. तुम्हाला अभ्यासाविषयी, किंवा संशोधनातील सहभागी म्हणून तुम्हाला असलेले अधिकार आणि तुमच्या जबाबदाऱ्या, अभ्यासात सहभागी व्हायचे की नाही याचा विचार करताना जोखमी आणि फायदे यांची तुलना करणे, याविषयी काही समजत नसल्यास किंवा अधिक माहिती हवी असल्यास प्रश्न विचारा.
2. स्वत: घेण्याच्या अभ्यास औषधाचा उपयोग, त्याचा डोस आणि साठवणी, जैविक नमुने देणे, आणि चाचण्या, पद्धती किंवा तपासण्या यासाठी तयारी करणे याविषयीच्या सूचनांचे पालन करा.
3. अभ्यासाशी संबंधित नसलेली औषधे न घेणे किंवा इतर उलट निर्देश असलेली औषधे न घेणे किंवा पद्धती करून न घेणे याविषयीच्या सूचनांचे पालन करा.
4. नियोजित भेटीच्या वेळी वेळेवर उपस्थित रहा तुम्हाला भेटीची वेळ पुन्हा बदलून हवी असल्यास वाजवी वेळेत कर्मचाऱ्यांना त्याची माहिती द्या.
5. चाळणी/नोंदणी आणि अभ्यासाच्या दरम्यान विचारलेल्या प्रश्नांची खरी उत्तरे द्या.
6. अभ्यासाच्या दरम्यान तुम्हाला काही अस्वस्थता, वेदना किंवा इतर समस्या आणि लक्षणे असल्यास त्याची माहिती द्या.
7. संशोधन डॉक्टर आणि संशोधन अभ्यास संघ यांना विचारल्याशिवाय कोणतीही औषधे घेऊ नका.
8. तुम्ही सध्या एखाद्या इतर चिकित्सिय परीक्षणात सहभागी असल्यास किंवा मागील एक वर्षाच्या कालावधीत दुसऱ्या एखाद्या चिकित्सिय परीक्षणात सहभागी झाले असल्यास त्याची माहिती डॉक्टरांना किंवा संशोधन अभ्यास संघाला द्या.
9. तुमचा मागील वैद्यकीय इतिहास, आणि आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, किंवा इतर वनौषधी उपचार यासारख्या पर्यायी उपचारांसह तुम्ही सध्या घेत असलेली सर्व औषधे, मागील सर्व तपासण्या आणि उपचारांचे सर्व रेकॉर्ड आणि खास करून कोणत्याही औषधाच्या संवेदनशीलतेसह ॲलर्जीची प्रतिक्रिया, यांची माहिती द्या.
10. तुम्ही अभ्यासातून माघार घेण्याचा निर्णय घेतल्यास डॉक्टरांना किंवा कर्मचाऱ्यांना त्याची माहिती द्या आणि माघार घेण्याच्या पद्धतींचे पालन करा.

अभ्यासातील सहभागी या नात्याने तुम्हाला असलेल्या अधिकारांविषयी काही चौकशी करायची असल्यास/चिंता असल्यास,
तुम्ही यांच्याशी संपर्क साधू शकता: डॉ. राहूल जे. वर्मा [सेक्रेटरी सदस्य, संस्थात्मक नीतिमत्ता समिती] यांच्याशी
**rfh.academics@rfhospital.org येथे / कृपया येथे संपर्क साधा: 022 35475326**